राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी, कार्यालय, पुणे

| | | | |
|---|---|---|---|
| उपसंचालक<br>तथा<br>उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु<br>महाराष्ट्र राज्य | दूरध्वनी क्रमांक | | ०२०-२६०५८७४७ (वै)<br>०२०-२६०५५५३० (का) |
| | फॅक्स क्रमांक | | ०२०-२६०५८२९२ |
| | तार | | जन्ममृत्यु |
| डॉ.नायडू रुग्णालय आवार,पुणे १ | इ-मेल | | sbhivs@pn3.vsnl.net.in |


जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/जन्म दाखला/ ९८९२-९४ /१०,दिनांक १७ फेब्रुवारी २०१०

प्रति,
आरोग्याधिकारी तथा
निबंधक, जन्म व मृत्यु,
कल्याण-डोंबिली महानगरपालिका,
जि. ठाणे

विषय :- सेरोगेट मदर प्रकरणी...

संदर्भ :- आपले पत्र क्र. कडोंमपा/आवि/मुका/जन्म मृत्यु/९९
दि. ३/२/२०१०

उपरोक्त विषयांतर्गत संदर्भीय पत्र व सहपत्रास अनुसरुन आपणास पुढील प्रमाणे मार्गदर्शन करण्यात येत आहे -

१) आपल्या उपरोक्त संदर्भिय पत्र व सहपत्रामध्ये श्री. दिलीप अहूजा यांचा अर्ज जोडण्यात आलेला नाही.

२) सोबतच्या वैद्यकिय अहवालाची सहपत्रे प्राप्त झालेली असून त्यासोबत Indian Council of Medical Research यांचा मान्यतेसाठी पाठविलेला Draft प्राप्त झाला.

३) भारत सरकारने अद्यापही सरोगेट प्रकरणात जन्म नोंद घेण्याबाबत कोणताही ठोस मार्गदर्शन पत्र अद्यापही पाठविलेलें नाही.

४) नमूद प्रकरणात केवळ भारत सरकारचे मार्गदर्शन उपलब्ध नाही म्हणून जन्म नोंद थांबविता येणार नाही.

५) सदर प्रकरणात जन्म नोंद हॉस्पिटलकडून प्राप्त होणे आवश्यक आहे.

६) हॉस्पिटलकडे सरोगेट बाबत सर्व कागदपत्र व संबंधितामधील करारनामा उपलब्ध असतो त्यावरुन त्याची खात्री करुन घेऊन त्यांनी पुढील कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

F:\83\Serrogated Child.doc

७) हॉस्पिटलने निबंधकाकडे नोंद पाठविताना मूळ आई व वडिलांचे नाव (Genetic Mother & Father) लिहून सदर नोंद पाठविणे आवश्यक आहे. फक्त Remark रकान्यात Soragate Case म्हणून उल्लेख करावा.

८) सरोगेट प्रकरणात वैद्यकिय कागदपत्रे व संबंधितातील करारनामा जतन करुन ठेवण्याची जबाबदारी संबंधित हॉस्पिटलची राहणार आहे. व कोणतीही वैद्यकिय अथवा न्यायालयीन वाद उत्पन्न झाल्यास त्याच पूर्णपणे निपटारा करण्याची जबादारी मुलाचे आई वडिल (Genetic Mother & Father) व हॉस्पिटल यांची राहणार आहे. केवळ संबंधित हॉस्पिटलकडून प्राप्त जन्म घटनेची नोंद घेण्याची जबाबदारी निबंधकाची असून त्यांनी पाठविलेल्या माहितीनुसार नोंद घेवून त्यास अनुसरुन जन्म प्रमाणपत्र अदा करण्याची जबाबदारी संबंधित निबंधकाची आहे याची नोंद घ्यावी.

९) हॉस्पिटलने सदर जन्माबाबतची मूळ फाईल व रेकॉर्ड जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. जेणेकरुन सदर प्रकरणाबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास अथवा प्रकरण न्यायालयात गेल्यास मूळ कागदपत्रे न्यायालयास सादर करता येतील.

१०) सदर जन्मनोंद हॉस्पिटलकडून प्राप्त झाल्यावर नोंदवहीत सोरोगेट प्रकरण असे शेरा रकान्यात लिहणे आवश्यक आहे. मात्र जन्म प्रमाणपत्रात सरोगेट उल्लेख होता कामा नये. व ही नोंद हॉस्पिटल मार्फतच येणे आवश्यक आहे.

११) भारत सरकारच्या सरोगेट प्रकरणी मार्गदर्शक सूचना प्राप्त होईपर्यंत वरील प्रमाणे जन्म नोंदणीबाबत कार्यप्रणाली नुसार जन्मनोंदी करण्यात याव्यात. भारत सरकारच्या जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ नुसार प्रत्येक घटनेची नोंद होणे व त्यानुसार प्रमाणपत्र अदा करणे कायदयाने बंधनकारक आहे.

17/2/02

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत माहितीसाठी :- जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म व मृत्यु,जिल्हा परिषद,ठाणे
प्रत सादर :- मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु,महाराष्ट्र राज्य,मुंबई

F:\83\Serrogated Child.doc